श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे अंगणवाडी पर्यवेक्षीका,
बीट पिंपळगाव ए.बा.वि.सेयो प्रकल्प -पाथर्डी यांनी
कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने त्यांचे विरुध्द
विभागीय चौकशी सुरु करणे कामी सादरकर्ता
चौकशी अधिका-याची नेमणूक करणे बाबत--

## जिल्हा परिषद, अहिल्यानगर
## महिला व बालकल्याण विभाग

जिल्हा परिषद,आदेश क्रं.एबाविसेयो/कार्या-१/ 670 /२०२५
अहिल्यानगर दिनांक -डिजिटल स्वाक्षरी खालील नमुद केले प्रमाणे

संदर्भ:- १) बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे कडील प्रपत्र क्रं.१ ते ४ पत्र जा.क्रं. एबाविसेयो/प्रशा/616/25 पाथर्डी दि.3/9/2025
२) महिला व बाल कल्याण विभाग कडील,ज्ञापन/दोषारोपपत्र जा.क्रं. एबाविसेयो/कार्या-१/ ६१२/२०२५ अहिल्यानगर दि.२/१०/२०२५
३) बाल विकास प्रकल्प अधिकारी पाथर्डी यांचे पत्र दि १६/१०/२०२५ दोषरोप पत्र बजावले बाबतची पोहच दि.३/१०/२०२५
४) श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे अंगणवाडी पर्यवेक्षीका यांचा खुलासा दि.१३/१०/२०२५
५) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा (शिस्त व अपिल )नियम १९६४ मधील ६(५)
६) महाराष्ट्र शासन,सामन्य प्रशासन विभागाकडिल परिपत्रक क्रं.वशिअ-१२१४/प्र.क्रं.२२/११ दिनांक २२ ऑगस्ट,२०१४

श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे अंगणवाडी पर्यवेक्षीका बीट-पिंपळगाव टप्पा ए.बा.वि.से.यो. प्रकल्प पाथर्डी ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर येथे कार्यरत असताना,त्यांनी त्यांच्या कर्तव्यात जबाबदारीमध्ये, तसेच कामकाजामध्ये हलगर्जीपणा व कार्यालयीन शिस्तीचा तसेच त्यांच्या पदाच्या कर्तव्य व जबाबदारी सुचीचा भंग केल्यामुळे, श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे अंगणवाडी पर्यवेक्षीका यांचे विरुध्द संदर्भ क्रं.१ नुसार बालविकास प्रकल्प अधिकारी पाथर्डी यांनी दोषरोप सादर केलेले आहे.

उपरोक्त संदर्भ क्रं.२ दोषारोप पत्र श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे अंगणवाडी पर्यवेक्षीका यांना संदर्भ .क्रं२ नुसार बजावण्यात आलेले आहे. श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे अंगणवाडी पर्यवेक्षीका यानी संदर्भ .क्रं.३ च्या खुलाशामध्ये दोषारोप अमान्य करण्यात आलेले आहे. सबब मंगल हरिभाऊ पाखरे अंगणवाडी पर्यवेक्षीका यांचे विरुध्द न्याय हक्कांचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे क्रमप्राप्त असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा (शिस्त व अपिल )नियम १९६४ मधील (६) च्या तरतूदीनूसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे.

सबब श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे अंगणवाडी पर्यवेक्षीका यांची खातेनिहाय चौकशी करणेसाठी चौकशी अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त विभागीय चौकशी ( जिल्हा परिषद कर्मचारी ) आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग ,नाशिक यांची नियुक्ती या आदेशान्वये करीत आहे. सदरच्या विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील .

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ६(५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजू मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणून श्री.विजय गणपत चौसाळकर

सहायक प्रशासन अधिकारी पंचायत समिती, पाथर्डी यांची नेमणूक या आदेशान्वये करीत आहे.सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे,उपरोक्त संदर्भ क्रं.२ मधील दोषरोप व पुरावे यांचा सखोल अभ्यासपुर्णत:हा करुन ,संदर्भ.क्रं.६ अन्वये जिल्हा परिषदेची बाजू मांडावी.

प्रपत्र क्रंमांक तीन व चार मध्ये ( दोषरोप पत्र ) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रासह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे.तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी सादरकर्ता अधिकारी या नात्याने आपली कर्तव्य पार पाडण्यात कसुर केल्याचे आढळून आल्यास आपणाविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

सदरचे आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक क्रमांक -202511140800 39 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 14-11-2025 22:02:53
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१) विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,(विभागीय चौकशी )नाशिक विभाग,नाशिक सोबत संबधित प्रकरणाचे प्रपत्र १ ते ४ व आवश्यक ते खुलासा कागदपत्रे क्रं.१ ते ~~१५०~~ 363

२) श्री.विजय गणपत चौसाळकर सहाय्यक प्रशासन अधिकारी,पंचायत समिती पाथर्डी,व्दारा व प्रत -गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी

२/- सदरच्या आदेशाची प्रत श्री.विजय गणपत चौसाळकर सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी यांना बजावून दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. सोबत - संबधित प्रकरणाचे आवश्यक ते कागदपत्रे पृष्ठ १ ते 363

३) श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे अंगणवाडी पर्यवेक्षिका बीट – पिंपळगाव टप्पा ए.बा.वि.से.यो. प्रकल्प पाथर्डी ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर

व्दारा - बाल विकास प्रकल्प अधिकारी,ए.बा.वि.से.यो.पाथर्डी ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर

२/- सदरच्या आदेशाची प्रत श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना बजावून दिनांकीत स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर